1. **दिनांक ......... च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रात केंद्रीय प्राथमिक शाळा व केंद्र प्रमुख पदाची निर्मिती करण्यात आली.**
   अ) 14 नोव्हेंबर 1994　　ब) 14 जुलै 2017
   क) 09 सप्टेंबर 2019　　ड) यापैकी नाही
2. **केंद्र प्रमुख हे पद ........ च्या आस्थापनेखाली येते.**
   अ) केंद्र शासन　　ब) जिल्हा परिषद
   क) पंचायत समिती　　ड) यापैकी नाही
3. **केंद्र प्रमुखाची मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे पदे भरण्याची संपूर्ण प्रक्रिया .......... यांच्या नियंत्रणाखाली चालते.**
   अ) आयुक्त (शिक्षण)
   ब) शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक
   क) शिक्षण संचालक प्राथमिक
   ड) जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी
4. **दिनांक 1 डिसेंबर 2022 च्या शासन निर्णयानुसार केंद्रप्रमुखाच्या एकूण पदापैकी ........ % पदे पदोन्नतीने व .......... % पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षाद्वारे भरण्यात येतील.**
   अ) 70 : 30　　ब) 60 : 40
   क) 50 : 50　　ड) 40 : 60
5. **केंद्र प्रमुख भरती संदर्भात विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा ....... मार्फत आयोजित करण्यात येईल.**
   अ) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
   ब) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
   क) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
   ड) जिल्हा निवड समिती
6. **केंद्र प्रमुख पदासाठी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे अर्ज करण्यासाठी उमेदवाराची कमाल वय मर्यादा ......... आहे.**
   अ) 40　　ब) 45
   क) 50　　ड) 55
7. **महाराष्ट्र राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या ......... प्राथमिक शाळांसाठी एक केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्यात येते.**
   अ) 5　　ब) 7
   क) 10　　ड) 20
8. **जिल्हा परिषदेच्या ........ शाळेकरिता केंद्र प्रमुख पद निर्माण करण्यात आले आहे.**
   अ) माध्यमिक　　ब) उच्च माध्यमिक
   क) उच्च प्राथमिक　　ड) केंद्रीय प्राथमिक

9. ............ जिल्हा परिषद शाळांसाठी एक केंद्र प्रमुखाचे पद निश्चित करण्यात आले आहे.

अ) 5 ब) 7

क) 10 ड) 20

10. केंद्रीय प्राथमिक शाळा आणि केंद्र प्रमुखाचे प्रमुख कार्य म्हणजे.......

अ) शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे सुक्ष्म नियोजन करणे

ब) विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकविण्यासाठी प्रयत्न करणे.

क) प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा उंचावणे

ड) यापैकी सर्वच कार्य

11. जिल्ह्याअंतर्गत जिल्हा परिषद शाळेकरिता एकूण केंद्र प्रमुखाची पदे निश्चित करण्याची जबाबदारी .......... यांची असते.

अ) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

ब) गटशिक्षणाधिकारी (सर्व)

क) मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.)

ड) शिक्षण उपसंचालक

12. केंद्र प्रमुखाची पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्यासंदर्भात आवेदनपत्र मागवणे, जिल्ह्यात परीक्षा केंद्र निश्चित करणे, परीक्षेचे वेळापत्रक जाहिर करणे, परीक्षा घेणे व निकाल जाहिर करणे ही संपूर्ण कामे .......... यांच्याकडून पार पाडली जातात.

अ) शिक्षण संचालनालय

ब) शिक्षण मंत्रालय

क) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

ड) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद

13. केंद्रीय प्राथमिक शाळाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे.....

अ) समूहातील प्राथमिक शाळांचे प्रशासकीय व शैक्षणिक संनियत्रण करणे.

ब) शिक्षणाचा सार्वत्रिकिकरणासंदर्भात समूहातील शाळांना वार्षिक व मासिक उद्दिष्टे ठरवून देणे.

क) समूहातील सर्व शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या किमान अध्ययन क्षमता संपादणूकीचे मूल्यमापन करणे.

ड) यापैकी सर्वच

14. दिनांक 14 नोव्हेंबर 1994 च्या शासन निर्णयानुसार एकूण ......... केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अ) 4860 ब) 5930

क) 6200 ड) 7800

15. केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुखाचे गोपनिय अहवाल...... लिहितात.

अ) केंद्र मुख्याध्यापक ब) विस्तार अधिकारी (शिक्षण)

क) गटशिक्षणाधिकारी ड) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

16. केंद्रीय प्राथमिक शाळेच्या केंद्र प्रमुखाचे विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी लिहिलेले गोपनिय अहवाल याचे पुनर्विलोकन ....... कडून करण्यात येते.

अ) गटशिक्षणाधिकारी

ब) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

क) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

ड) मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.)

17. केंद्र प्रमुखाना नैमित्तीक रजा मंजूर करण्याचा अधिकार ....... यांना असतो.

अ) विस्तार अधिकारी (शिक्षण)

ब) गटशिक्षणाधिकारी

क) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

ड) मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.)

18. जिल्हा परिषद शाळांमधून केंद्रीय शाळा निवडण्यासाठी त्या शाळेची पटसंख्या कमित कमी .......... पेक्षा अधिक असावी.

अ) 150 ब) 180

क) 200 ड) 250

19. केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुखाची प्रमुख कर्तव्य म्हणजे ...........

अ) समूहातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांच्या मासिक गट संमेलनाचे आयोजन करणे.

ब) समूहातील सर्व शाळांमध्ये सहशालेय कार्यक्रमाचे नियोजन करणे

क) महिन्यातून किमान एक ग्राम शिक्षण समितीच्या बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

ड) यापैकी सर्वच

20. समूहातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकाचे / शाळा प्रमुखाचे वार्षिक गोपनिय अहवाल ........... लिहितात.

अ) केंद्र प्रमुख ब) विस्तार अधिकारी (शिक्षण)

क) गटशिक्षणाधिकारी ड) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

21. केंद्र प्रमुखानी आठवड्यातून किमान ........ तासिका अध्यापन करणे आवश्यक आहे.

अ) बारा ब) आठ

क) सहा ड) चार

22. केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करीत असताना या शाळां संदर्भात शासनाच्या ......... अपेक्षा होत्या.

अ) केंद्र शाळा ही समूहातील शाळांसाठी व शिक्षकांसाठी शैक्षणिक संशोधन संस्था म्हणून कार्य करेल.

ब) समूहातील शाळेस किमान दोन महिण्यातून एकदा भेट देवून भेटिचा अहवाल शिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करतील.

क) समूहातील मुख्याध्यापक व शिक्षकाच्या प्रयत्नाने शाळाबाह्य मुलांना विशेष प्रयत्नातून शाळेत दाखल करुन घेतील

ड) यापैकी सर्वच

**23. शासन निर्णय 10 जून 2014 च्या अधिसूचनेनुसार इंग्रजी भाषा विषयाकरिता ........ % केंद्र प्रमुखाची पदे राखीव असतील.**

अ) 20 %   ब) 30 %

क) 50 %   ड) 60 %

**24. केंद्र प्रमुखाच्या नियोजन विषयक कार्यास .......... कार्याचा समावेश होतो.**

अ) केंद्र शाळा अंतर्गत 100 % विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करण्याचे नियोजन करणे.

ब) केंद्र शाळा अंतर्गत सर्व शिक्षकांना शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी वर्ग व विषय वाटून देणे.

क) केंद्र शाळा अंतर्गत सर्व शिक्षकांच्या सेवातर्गंत प्रशिक्षणाचे वार्षिक नियोजन करणे.

ड) यापैकी सर्वच

**25. केंद्र प्रमुखाच्या मूल्यमापन विषयक कार्यात ......... चा समावेश होतो.**

अ) केंद्राअंतर्गत शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकाचे वर्षा अखेरीस मूल्यमापन करुन त्यांचा गोपनीय अहवाल लिहणे.

ब) केंद्राअंतर्गत प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता तपासण्याहेतू क्षमताधिष्ठित मूल्यमापन रजिस्टर ठेवले आहे का व ते नियमित भरले जाते का ? याची तपासणी करणे.

क) केंद्राअंतर्गत प्रत्येक शाळेतील सर्व मुलांमुलीची त्रैमासिक क्षमताधिष्ठित चाचणी घेणे.

ड) यापैकी सर्वच

**26. केंद्र प्रमुखाच्या शैक्षणिक कर्तव्यात .......... कर्तव्याचा समावेश होतो.**

अ) दरवर्षी केंद्रातील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या सहाय्याने शाळा प्रवेश पात्र मुलांचे 100 % सर्वेक्षण करुण घेणे.

ब) 31 जुलै पूर्वी शाळा दाखलपात्र मुलामुलीची 100 % पटनोंदणी झाली किंवा नाही याची खात्री करणे.

क) शाळानिहाय पटनोंदणीपैकी 5 % पटनोंदणीची प्रत्यक्ष पडताळणी करून पहाणे.

ड) यापैकी सर्वच

**27. केंद्र प्रमुखांनी शाळा भेटी दरम्यान .......... बाबी पडताळून पाहणे आवश्यक असते.**

अ) शिक्षकांनी केलेले कार्य

ब) विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता

क) विद्यार्थ्यांचे स्वाध्याय, गृहपाठ, प्रयोग इत्यादी

ड) यापैकी सर्वच

**28. केंद्र प्रमुखाच्या प्रशासकीय कार्यात ........... कार्यांचा समावेश होतो.**

अ) केंद्राअंतर्गत शाळांना नियमित भेटी देणे.

ब) शिक्षकांच्या उपस्थितीसंदर्भात दक्ष राहून अनुपस्थित शिक्षकां संदर्भात योग्य तो अहवाल वरिष्ठांकडे पाठवणे.

क) शासनाच्यावतीने विद्यार्थी आणि शिक्षकाच्या संदर्भातील विविध शासकीय योजनेसंदर्भात प्रेरक म्हणून कार्य करणे

ड) यापैकी सर्वच

**29. केंद्र प्रमुखानी आर्थिक बाबीसंदर्भात ........ कर्तव्य पार पाडले आवश्यक आहे.**

अ) शासन आणि जिल्हा परिषदेच्यावतीने वेळोवेळा निर्गमीत करण्यात येणाऱ्या आदेशाचा अभ्यास करून त्यासंदर्भात मुख्याध्यापकाना मार्गदर्शन करणे.

ब) केंद्राअंतर्गत शाळादरम्यान काही आर्थिक गैरव्यवहार आढळल्यास अशी बाब तात्काळ वरिष्ठांच्या लक्षात आणून देणे.

क) शालेय साहित्याची खरेदी करीत असताना किंवा शासकीय अनुदानाचा वापर करीत असताना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत सर्व शाळांना मार्गदर्शन करणे

ड) यापैकी सर्वच

**30. केंद्र प्रमुखाच्या कार्यालयीन कर्तव्यात .......... कर्तव्याचा समावेश होतो.**

अ) प्रत्येक महिण्याच्या 25 तारखेपूर्वी पुढील महिण्यातील संभाव्य शाळा भेटीचा कार्यक्रम विस्तार अधिकारी यांच्याकडे सादर करणे.

ब) दर महिण्याच्या 5 तारखेपूर्वी मागील महिण्यातील शाळा भेटीचा कार्यक्रम विस्तार अधिकारी यांच्यामार्फत गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविणे.

क) केंद्र प्रमुख कार्यलयाचे संपूर्ण रेकॉर्डस अद्ययावत ठेवणे

ड) यापैकी सर्वच

## उत्तरसूची

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | (अ) | 2. | (ब) | 3. | (क) | 4. | (क) | 5. | (ब) |
| 6. | (क) | 7. | (क) | 8. | (ड) | 9. | (क) | 10. | (ड) |
| 11. | (क) | 12. | (क) | 13. | (ड) | 14. | (अ) | 15. | (ब) |
| 16. | (अ) | 17. | (अ) | 18. | (क) | 19. | (ड) | 20. | (अ) |
| 21. | (अ) | 22. | (ड) | 23. | (क) | 24. | (ड) | 25. | (ड) |
| 26. | (ड) | 27. | (ड) | 28. | (ड) | 29. | (ड) | 30. | (ड) |